e99

CR1990020901

भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूच्या तयार करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक भनिनि-१०९०/प्र.क्र. २७/९०/कोषागार-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ फेब्रुवारी १९९०

## प रि प त्र क

भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूच्या कशा तयार कराव्यात याबाबतच्या सविस्तर सुचना परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक एमआयएस-१०८०/सीआर-४५१/ ८०/ एडीएम-९, दिनांक २३ जून १९८० आणि परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण- १०८७/प्र. १२९५/प्र.क्र. २६९/कोषागारे-४, दिनांक ४ सप्टेंबर १९८७ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. असे असुन सुध्दा आहरण व संवितरण अधिका-यांकडून भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूच्या योग्य रीत्या आणि काळजीपूर्वक तयार केल्या जात नसल्यामुळे, तसेच भविष्य निर्वाह निधीमधून काढावयाच्या रकमेच्या/अग्रीमांच्या देयकांवर योग्य वर्गीकरण न नोंदविल्यामुळे भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदाराच्या खात्यावर मासिक जमा खर्चाच्या नोंदी वेळच्या वेळी घेता येत नाहीत. परिणामी संबंधित वर्गणीदाराच्या खात्यावर भविष्य निर्वाह निधीची नेकमी किती रक्कम शिल्लक आहे ते समजण्यात अडचण निर्माण होते. चुकीच्या वर्गीकरणामुळे फार मोठ्या प्रमाणात रकमा संबंधित कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर नोंदविता आलेल्या नाहीत असे महालेखापालांनी शासनाचे निदर्शनास आणले आहे.

२. वरील परिस्थिती विचारात घेऊन सर्व कार्यालय/ विभाग प्रमुख यांना पुन्हा अशी विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे नियत्रणाखालील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांना उपरोल्लेखित दिनांक २३ जून १९८० आणि दिनांक ४ सप्टेंबर १९८७ या परिपत्रकातील, तसेच खाली दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

[१] सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या आगाऊरकमेचे/ पैसे काढण्याबाबतचे देयकाच्या शेवटी वर्गीकरणाच्या खाली
" Account of Class IV Servants — Other than Class IV Servants"
असलेल्या मजकुरातील अनावश्यक मजकूर स्पष्टपणे खोडण्यात यावा.

[२] चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी तृतीय श्रेणीत पदोन्नत झाल्यावर त्यांचे भविष्य निधीचे खाते " Other thanClass IV Servnts " या शीर्षाखाली बदलण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

[३] भविष्य निर्वाह निधीच्या अनुसूच्या सुवाच्च असाव्यात.

[४] वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधीचा क्रमांक आणि नाव अचूक असावे.

[५] वर्गणीदाराची बदली दुस-या विभागात झाल्यास अथवा दुस-या विभागातून वर्गणी दार बदलुन आल्यास त्याबाबतची माहिती अनुसूचीमध्ये न चुकता नमुद करावी.

....२/-

[६] भविष्य निर्वाह निधिचे क्रमांक अनुसूचीमध्ये चढत्या क्रमाने लिहिण्यात यावेत.

[७] वर्गणिदारांच्या नावाचा क्रम अनुसूचीमध्ये नेहमी कायम ठेवण्यात यावा. त्यात बदल करण्यात येऊ नये.

[८]एखाद्या महिन्याच्या वेतन देयकातून वर्गणी कापून घेतली नसल्यास, अनुसूचीतील त्याचे क्रमांक व नावापुढे त्याबद्दलचे कारण शे-याचे स्तंभात नमूद करण्यात यावे.

[९] वर्गणिचे दरात अथवा भ. नि. नि. अग्रिमाच्या वसुलीच्या हप्त्याचे रकमेत बदल झाला असल्यास, त्याचे कारण/ कारणे शे-याचे स्तंभात नमुद करण्यात यावीत, इत्यादी.

३. सर्व कोषागार अधिका-यांना अशीही विनंती करण्यात येते की, भविष्य निर्वाह निधीतून काढावयाच्या रकमेचे/ अग्रिमाचे देयक प्रदानासाठी दाखल करून घेण्यापूर्वी त्यावर नमुद केलेल्या वर्गीकरणाची अचूकता तपासून पहावी.

व. ना. सावंत,
उप सचिव, वित्त विभाग.

---

क्रमांक एसी-२६७/अ-१/९०
पुणे, दिनांक ४ .४.९० .

सर्व कार्यालय प्रमुख यांना माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म. रा. ] पुणे
यांचेकरिता.